# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

9/5-17

**क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४/1706** **दिनांक : ७.९.२०१७**

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक.
दि.१२.९.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता.
**स्थळ : मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्व्छता यांचे मंत्रालयातील दालनात.**

**महोदय,**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक दि. १२ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता मां.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे मंत्रालयीन दालनात, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर बैठकीसाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

बैठकीच्या कार्यक्रमबाबीची विषयसुची लवकरच स्वतंत्ररित्या उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

**प्रत :** खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई. यांचे माहितीसाठी. वरिलप्रमाणे आयोजित बैठकीबाबत मा.मंत्री महोदयांना, अवगत करावे ही विनंती.

**प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

पत्राची पोहच.

क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४ दिनांक : ८ .९.२०१७

विषय : दि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक.
दि.१२.९.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता.
**स्थळ : मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे मंत्रालयातील दालनात.**

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
022-22794291

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
minrdpro@gmail.com / 022-22025051 / 022-22023858

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
ranjit.patil@gov.in / 022-22875930

मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
stateminister.agri@gmail.com 22842611/22842592

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
psec.pubhealth@maharashtra.gov.in 22617388

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
psec.wssd@maharashtra.gov.in

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
psec.reforms@maharashtra.gov.in 22029108

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
psec.energy@maharashtra.gov.in Tel 22026767

प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
sec.ud2@maharashtra.gov.in - 22021444

प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
sec.rdd@maharashtra.gov.in 022-22060446

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई. - ms@mjp.gov.in

मा. संचालक (वित्त) finance@mjp.gov.in

अ. अ. (मुख्यालय) - sehamjp21@gmail.com

मंत्री (पापुवस्वचि) यांचे कार्यालय - ८.९.१७

लिपीक मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०००३२

पत्राची पोहच.

क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४ / १०८ दिनांक : ११.९.२०१७

**विषय :** दि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक.
दि.१२.९.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता.
स्थळ : मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे मंत्रालयातील दालनात.

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

उप सचिव पा.पु. व स्वच्छता वि. मंत्रालय मुंबई

खाजगी सचिव मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय

मुख्यमंत्री सचिवालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लिपीक, मंत्री, ग्रामविकास आणि महिला व बालविकास, यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

लिपिक, प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) कार्यालय, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लिपिक, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

11/9/2017

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.

क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४/१७०८ दिनांक : ११.९.२०१७

प्रति,
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक.**
**दि.१२.९.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता.**
**स्थळ :** मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे मंत्रालयातील दालन.
**संदर्भ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सम क्रमांकाचे दि.७.९.२०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक दि. १२ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांचे मंत्रालयीन दालनात, मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

बैठकीच्या कार्यक्रम बाबी सोबत सादर करण्यात येत आहेत.

सदर बैठकीसाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

आपला विश्वासू,

(अशोक मांडे)
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

**सोबत :** वरील प्रमाणे.

**प्रत :** खाजगी सचिव, मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
वरिलप्रमाणे आयोजित बैठकीबाबत मा.मंत्री महोदयांना अवगत करावे, ही विनंती.
प्रत : संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.
प्रत : उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
प्रत :अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

संचालक मंडळाच्या १३९व्या बैठकीसाठी प्राप्त झालेल्या कार्यक्रम बाबी.



| अ.क्र. | विषय | पृष्ट क्रमांक |
|---|---|---|
| १. | म.जी.प्रा. १३८व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणेबाबत. | १ ते १२ |
| २. | म.जी.प्रा. १३८व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कार्यवाही. | १३ ते १६ |
| ३. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पांणी पुरवठा केंद्राच्या घसारा निधीमधून उपलबध असणाऱ्या व्याजाच्या रक्कमेमधून कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायीत्वाच्या अदायगीबाबत. | १७ ते ३३ |

पत्राची पोहच.

क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४ / १९०८

दिनांक : ११.९.२०१७

**विषय** : दि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची १३९वी बैठक.
दि.१२.९.२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता.
स्थळ : मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे मंत्रालयातील दालनात.

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

उप सचिव पा.पु. व स्वच्छता वि. मंत्रालय मुंबई

खाजगी सचिव मा.मंत्री पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ....२२/९/१७

लिपीक, मंत्री,
ग्रामविकास आणि महिला व बालविकास,
यांचे कार्यालय,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

लिपिक
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा)
महाराष्ट्र शासन, वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

लिपिक
मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**कार्यक्रम बाब क्र. १ :-**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८व्या सभेचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सोबत जोडण्यांत येत आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३८वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.ना.श्री.बबनराव लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी दुपारी १.०० वा. मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना. श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.सदाशिव खोत, राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३) मा.श्री.राजेश कुमार, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४) मा.प्रधान सचिव,(वित्तीय सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, यांचे प्रतिनिधी श्री.कि.मा.सुर्यवंशी, अवर सचिव.
५) मा.प्रधान सचिव, ग्रा.वि.वि. तथा प्राधिकरणाचे सदस्य, यांचे प्रतिनिधी श्री.शै.शं.खाडे, सहा.क.अ.
६) मा.श्री.हेमंत लांडगे, संचालक(तां.) म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य, मुंबई.
७) मा.श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, म.जी.प्रा.तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.उदय जाधव, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
३) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३७ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची १३७ वी सभा दि.२३ ऑगस्ट, २०१६ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३७व्या सभेच्या इतिवृत्तास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३७ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्याबाबत.

संचालक मंडळाची दि.२३ ऑगस्ट, २०१६ रोजी संपन्न झालेल्या १३७व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १३७ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१३-१४ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून, तो विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा.सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.४** राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतवण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने मजीप्राने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणे बाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा. सदस्य सचिव, यानी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुंतवावी याबाबत शासनाने दि.२७.१०.२०१५ अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्र

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

जीवन प्राधिकरणा कडूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूका केल्या जातात, असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

प्राधिकरणाच्या १३७ व्या बैठकीत दि.१७.३.२०१६ ते दि.१९.७.२०१६ या कालावधीचे अल्प/ दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि.२०.७.२०१६ ते दि.२.३.२०.२०१७ या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मा. संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव:-**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२०.७.२०१६ ते दि. २..३.२०१७ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.५ :** म.जी.प्रा. च्या लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडे सोपविणे बाबत. कालावधी दि.१.४.२०१७ ते दि.३१.३.२०२२

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन दि.१.४.२०१७ ते दि.३१.३.२०२२ या कालावधीतील लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांना Comptroller and Auditor General कायदा १९७१ मधील कलम २० (१) नुसार महानियंत्रक व महालेखा परिक्षक यांचेकडे सोपविण्याचे प्रस्तावित असून त्यास मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्याची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

याबाबत चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.६ : सन २०१६-१७चे सुधारित व सन २०१७-१८चे अर्थसंकल्पिय अंदाज.**

सदस्य सचिव यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मा.संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले.

सदर अदाजपत्रकातील बाबीवर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१५-१६ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली व खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन-२०१६-१७ चे सुधारित अंदाज व सन-२०१७-१८ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

**(रुपये लाखात)**

| अ.क्र. | तपशिल | सन-२०१५-१६ चे सुधारित अंदाज | सन-२०१६-१७ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १ | महसुली जमा | ४३५५१.९८ | ४३३०६.३७ |
| २ | महसुली खर्च | ५१५७२.४७ | ६३३२०.९८ |
| ३ | भांडवली जमा | ७४३९९.६१ | ९४५१४.५० |
| ४ | भांडवली खर्च | ७४३९९.६१ | ९४५१४.५० |

असा ठराव करण्यात येतो की, शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णय क्र.मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३(अ)/पापु-२३, दि.२३ मार्च, २०१७ मधील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियमित वेतन व भत्याचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांच्या निवृत्ती वेतनाचे दायित्व राज्य शासनामार्फत स्वीकारण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

६

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण म्हणून स्वायत्त होण्यापूर्वी जे अधिकारी/ कर्मचारी शासकीय अधिकारी/ कर्मचारी म्हणून नियुक्त झाळे होते, अशा अधिकारी/कर्मचा-यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल.

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण म्हणून स्वायत्त संस्था स्थापन झाल्यानंतर प्राधिकरणाचे जे अधिकारी/ कर्मचारी नियुक्त झालेले आहेत, अशा अधिकारी/कर्मचा-यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविण्यात येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सन २०१७-१८ मध्ये महसूल जमा व महसूली खर्चात जी तुट रु.२००.१५ कोटी होणार आहे. याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वित्त विभाग वेळोवेळी उपरोक्त शासन निर्णयात दिलेल्या मार्गदर्शनानुसार निधी मागणी करणार आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.७ :** १) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ पा.पु.योजना.
२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत कुळगांव - बदलापूर पा.पु.योजना.
शासकीय अनुदान वगळता मजीप्राच्या हिश्याची रक्कम उपलब्ध करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानाची अंमलबजावणी राज्य शासनाच्या दि.१३ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णय क्र.अमृत २०१५/प्र.क्र.१९७/नवि-३३ अन्वये राज्यामध्ये सन २०१५-१६ पासुन करण्यात येत आहे. त्यानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या आराखडयामध्ये समाविष्ट असलेल्या म.जी.प्रा.च्या मालकीच्या अंबरनाथ व कुळगांव-बदलापूर शहराच्या पाणी पुरवठा प्रकल्पास अनुक्रमे दि. २३ जून २०१६ च्या शासन निर्णय क्र.अमृत-२०१६/प्र.क्र.१४५(६)/नवि-३३ व शासन निर्णय क्र.अमृत-२०१६/प्र.क्र.१४५(७)/नवि-३३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. अमृत अभियानांतर्गत अंबरनाथ व बदलापूर योजनांच्या भांडवली खर्चाच्या

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

दृष्टीने योजनांच्या मंजूर वित्तीय आकृतीबंधानुसार अंबरनाथ व बदलापूर या दोन्ही योजनांसाठी अनुक्रमे रु.३.४०८कोटी व रु.४.४४३ कोटी म्हणजेच एकूण रु.७.८५१ कोटी एवढी कर्ज उभारणी म.जी.प्रा.चा हिस्सा म्हणुन करावी लागेल. त्यासाठी वित्तीय संस्थाकडील कर्जाचा व्याजदर किमान १०.२५ % एवढा असुन ॲप्लीकेशन फी सेवाकर इ. विचार करता सर्वसाधारणपणे ११% इतका व्याजदर देय राहील. या तुलनेत म.जी.प्रा.चा स्वत:चा निधी मुदत ठेवीमध्ये बॅकामध्ये गुंतवणुक केल्यास म.जी.प्रा.ला सरासरी ८.७५ % प्रतिवर्ष व्याज प्राप्त होते.

म.जी.प्रा.स बाहय वित्तीय संस्थांकडून कर्ज उपलब्ध करण्याऐवजी नगरोत्थान कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ व बदलापूर पाणीं पुरवठा योजनेसाठी म.जी.प्रा.च्या हिश्यापोटी घसारा निधीतून रु.७.८५१ कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देणे संयुक्तीक ठरेल. सदस्य सचिव यांनी सातारा पाणी पुरवठा योजनेसाठी अमृत योजनेसाठी 7.52 कोटी मंजूर झालेली आहे. व या पोटी सुट २५% म्हणजे 1.88 कोटी म.जी.प्रा.ला दयावी लागणार आहे, हे बोर्डाच्या लक्षात आणुन दिले व तत्वत: मान्यतेची विनंती केली.

**ठराव :-**

१. म.जी.प्रा.च्या मालकीच्या अंबरनाथ पाणी पुरवठा केंद्रांतर्गत केंद्र शासनाच्या अमृत अभियान कार्यक्रमात मंजूर अंबरनाथ व बदलापूर शहरांच्या पाणी पुरवठा योजनांसाठी मंजूर आकृतीबंधानुसार म.जी.प्रा.च्या हिश्श्याची रक्कम म.जी.प्रा.ने घसारा निधी मधून उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. म.जी.प्रा.च्या हिश्श्याची दोन्ही योजनांसाठीची रु.७.८५१ कोटी इतकी रक्कम कामाच्या प्रगतीनुसार म.जी.प्रा.ने घसारा निधी मधुन उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान करणयत येत आहे.

३. म.जी.प्रा.च्या घसारा निधीमधून उपलब्ध करुन द्यावयाच्या रु.८.८५१कोटी रक्कमेची परतफेड दोन्ही योजनांच्या उत्पन्नातून १५ वर्ष कालावधीसाठी रु.९५.८८लक्ष दरसाल या समान हप्त्याने(EMI) म.जी.प्रा.च्या घसारा निधीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

४. अमृत योजने अंतर्गत सातारा पाणी पुरवठा योजनेच्या हिस्सापोटी २५%रक्कम देणे तत्वत: मान्य केले.

**कार्यक्रम बाब क्र.८ :** उत्तमनगर, शिवणे, कोंढावे, धावडे, न्यु कोपरे प्रादेशिक पा.पु. यो. अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या पाणी दरवाढीस स्थगिती देणेबाबत.

उत्तमनगर, शिवणे, कोंढावे, धावडे, न्यु कोपरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी लागू करण्यात आलेल्या पाणी दराबाबत अंतर्गत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. मा.सदस्य सचिव, यांनी याबाबत संचालक मंडळास अवगत केले, या बाबीवर सविस्तर चर्चा होऊनसंचालक मंडळाने खालील प्रमाणे सुधारित प्रस्तावित पाणी दर आकारणीस मान्यता दिली.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**"ठराव"**

असा ठराव करण्यात येतो की, उत्तमनगर, शिवणे, कोंढावे, धावडे, न्यु कोपरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेतून होणाऱ्या पाणी पुरवठ्याचे दर दि.१.७.२०१५ पासून आकारण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे.

| प्रचलित दर | | | | | प्रस्तावित सुधारित दर | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) अधिसुचना क्र.मजीप्रा/एफअे-२/परिव्यय/२३/२०१५, दि.१७ जुलै, २०१५.<br>२) अधिसुचना क्र.मजीप्रा/एफअे-२/परिव्यय/२८/२०१५, दि. ७ ऑगस्ट, २०१५ चे शुध्दीपत्रक. | | | | | (पाण्याचे दर रुपये प्रती १००० लि.) | | | | |
| अ. क्र. | तपशिल | | एकूण पाणी वापरास प्रति १५००० लि. दर. | पाण्याचा वापर १५००० लि. पर्यंत | अ. क्र. | तपशिल | | एकूण पाणी वापरास प्रति १५००० लि. दर. | पाण्याचा वापर १५००० लि. पर्यंत |
| २) | | किरकोळ पाणी पुरवठा | -- | | २) | | किरकोळ पाणी पुरवठा | -- | |
| अ) | i) | घरगुती | -- | | अ) | i) | घरगुती | -- | |
| | ii) | शहरी व निमशहरी* | -- | १५.७० | | ii) | शहरी व निमशहरी* | -- | १४.३० |

| (दोन) मापन यंत्र बसविण्यांत आलेल्या नळ जोडण्यांसाठी प्रति महा किमान दर रुपयात | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रचलित दन | | | प्रस्तावित सुधारित दर | |
| नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रती नळ जोडणीस प्रतीमाह | | नळ जोडाचा व्यास | किरकोळ घरगुती वापरासाठी प्रती नळ जोडणीस प्रतीमाह |
| १ | २ | | १ | २ |
| | शहरी | | | शहरी |
| १५ मि.मि. | रु.१५४.०० | | १५ मि.मि. | रु.१४०.०० |

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

९

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्विकृतीच्या / अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत.

या कार्यक्रम बाबी बाबत मा. सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले.

दि.३ मार्च, २०१५ रोजी संपन्न झालेल्या मा. संचालक मंडळाच्या १३२व्या बैठकीत मजीप्राच्या निविदा समितीच्या ८९व्या बैठकीपर्यंत घेण्यात आलेल्या निविदा स्वीकृती/ अस्वीकृतीच्या निर्णयांवर मा. संचालक मंडळाकडुन शिक्का मोर्तब करण्यासाठीची कार्यक्रमबाब सादर करण्यात आली.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुसार ठराव पारित करण्यात आला.

**ठराव** :

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा समितीच्या ९० व्या बैठकीपासून ते ९७ व्या बैठकीपर्यंतच्या बैठकीमध्ये निविदा समितीने निविदा स्वीकृत / अस्वीकृत बाबत घेतलेल्या निर्णयांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.२** Bottling Plant/ Beverages इत्यादी खाजगी वापरासाठी पुरवावयाच्या पाण्याच्या दरांमध्ये सुधारणा करणेबाबत.

मा. सदस्य सचिव यांनी Bottling Plant/Beverages इत्यादी खाजगी उत्पादकासाठीच्या वापरासाठी पुरवावयाच्या पाण्याच्या दरामध्ये सुधारणा करण्या विषयी मा.संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आले.

मा. प्रधान सचिव, ( पाणी पुरवठा व स्वच्छता ) यांनी विचारणा केली की, या प्रकारचे किती ग्राहक म.जी.प्रा.च्या. पाणी पुरवठा केंदातुन पाणी पुरवठा घेत आहेत. याबाबत सर्व माहिती प्राप्त करावी. संचालक (तां.) यांनी इतका जास्तीचा दर वाढवू नये असे सांगितले.

सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन सदर बाबी पुढील बैठकीत सादर करावा अशा सुचना देण्यात आल्या.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.३** स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थकीत असलेल्या पाणी पट्टी, देखभाल, दुरुस्ती, १०% लोकवर्गणी, पुर्ण ठेव योजना व इतर येणी तसेच कर्जाच्या अनुषंगाने थकबाकीवरील दंडनीय व्याजाकडे सुट देण्याबाबत.

या कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले की, प्राधिकरणाची स्थानिक स्वराज्य संस्थांकडून थकीत असलेल्या पाणी पट्टीवरील विलंब आकार माफीबाबत मजीप्राच्या संचालक मंडळाच्या दि.२८.३.२०१६ रोजीच्या १३६व्या बैठकीमध्ये निर्णय झाला. बैठकीतील चर्चेनुसार स्थानिक स्वराज्य संस्था म.जी.प्रा.ची विषयांकित थकबाकी विहित दिनांकास, भरणा करीत नसल्यामुळे मुळ पाणी पट्टीवरील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम - १९७६ च्या उपविधीतील कलम-१५ च्या तरतुदीप्रमाणे मुळ सुधारित दराने प्रतिमहा १% विलंब आकार लावण्याची तरतूद आहे. तथापी माफ करण्याची तरतूद नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था/ इतर ग्राहकांकडील थकबाकी रकमेत वाढ होत आहे.

सद्यस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मजीप्रास देय असलेल्या थकबाकीची विविध लेखाशिर्ष आहेत, त्यावरील विलंब आकार व कर्जावरील दंडनीय व्याजाचे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | विलंब आकार/ दंडनीय व्याजाची आकारणीची टक्केवारी | शासनाचे पत्र क्रमांक व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे परिपत्रक क्रमांक व दिनांक. |
|---|---|---|---|
| १. | पाणी पट्टी | दि.१.१.२००७ पूर्वी १.५ टक्के दि.१.१.२००७ नंतर १.०० टक्के | शासनाचे पत्र क्र.इएसटी-२००६/ प्र.क्र.६६ /पापु-२३ दिनांक.५.१०.२००६. |
| २. | देखभाल व दुरुस्ती | १.५टक्के | मजीप्रा/वित्त-१/वक/थकबाकी /दे.दु./वि.आ/२००३-०४/२७३ दि.११.३.२००४ |
| ३. | १०टक्के लोकवर्गणी, पुर्ण ठेव योजना, इतर येणी | १.०० टक्के | मजीप्रा/वित्त-१/निभर्य ३३८ दि.७.६.२००४ |
| ४. | कर्जावरील दंडणीय व्याजाची आकारणी. | १३.०० टक्के | आयुर्विमा महामंडळाकडून कर्जाच्या रक्कमे-वरील विविध दराने केलेल्या व्याजाच्या अकारणीवर पुर्वीपासून सरासरी दर १३.०० टक्के प्रमाणे दंडनीय व्याज आकारले जात आहे. |

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

मजीप्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थाकडे दि.३०.६.२०१५ रोजी एकूण मुद्दल रु.१०९७.१६ कोटी व त्यावरील व्याजाची रक्कम रु.२२४८.९५ कोटी (विलंब आकार) असे एकूण रु.३३४६.११ कोटी म.जी.प्रा. ची येणे बाकी आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांनी थकबाकी भरण्यास प्रोत्साहन मिळण्यासाठी शासनाने सन २००४ पासून दि.३१.७.२०१५ पर्यंत निर्भय योजना मंजूर केली होती की ज्यामध्ये स्थानिक संस्था या योजनेत सहभागी होऊन १००टक्के मुद्दलीची रक्कम भरणा करेल त्यांना थकबाकीवर लावलेले व्याज १००टक्के माफ करण्याची तरतूद होती. आता ही योजना दि.३१.७.२०१५ रोजी संपुष्टात आली असल्याने थकबाकी भरण्यास प्रोत्साहन म्हणून स्थानिक संस्थाना व्याजामध्ये काही प्रमाणात सवलत देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

यापुढे मजीप्राची थकबाकी वसून करण्यासाठी सरसकट निर्भय योजना लागू करणे संयुक्तीक राहणार नाही. तथापी यापुढे ज्या स्थानिक स्वराज्य संस्था मुद्दलाची रक्कम परतफेड करतील त्यांच्या प्रमाणशीर टक्केवारीने उदा.२५%, ५०%, ७५% व्याज माफ करता येईल

म.जी.प्रा.ची थकबाकी स्थानिक स्वराज्य संस्था विहित दिनांकास भरणा करीत नसल्याने पाणी पट्टी, देखभाल दुरुस्ती, १०टक्के लोकवर्गणी, पुर्ण ठेव योजना आणि इतर थकीत येणी त्याचप्रमाणे कर्ज अनुषंगिक थकबाकीवरील व्याज व कर्जावरील मजीप्राने आकारलेले १३टक्के दंडणीय व्याज माफ करण्यात यावे. ज्या स्थानिक स्वराज्य संस्था दि.३० जून २०१५ अखेरीची मजीप्राची थकबाकी त्यांचे आर्थिक क्षमतेनुसार कमी प्रमाणात भरणा करतील त्यांना पाणी पट्टी, देखभाल दुरुस्ती, १०टक्के लोकवर्गणी, पुर्ण ठेव योजना आणि इतर थकीत येणी वरील व्याज व कर्जावरील आकारलेले दंडणीय व्याज त्यांनी भरणा केलेल्या रक्कमेच्या प्रमाणशिर तत्वाने माफ करणेबाबत प्रस्तावीत करण्यात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाचे कर्जावरील व्याज भरणे गरजेचे राहील केवळ दंडनिय व्याज माफ करता येईल.

**ठराव :**

**असा ठराव करण्यांत येतो की,**

ज्या स्थानिक स्वराज्य संस्था यापुढे दि.३०.६.२०१५ अखेरची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची थकबाकीच्या मुद्दलाची रक्कम भरतील त्यांना थकबाकीवर आकारलेल्या दंडनीय व्यांजात खालील प्रमाणे माफी देण्यांत यावी.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

१) ज्या स्थानिक स्वराज्य संस्था थकबाकीच्या मुद्दलाच्या २५% रक्कम भरतील त्यांना थकबाकीवर लावलेल्या दंडणीय व्याजाच्या २५% सवलत देण्यांत यावी.
२) ज्या स्थानिक स्वराज्य संस्था थकबाकीच्या मुद्दलाच्या ५०% रक्कम भरतील त्यांना थकबाकीवर लावलेल्या दंडणीय व्याजाच्या ५०% सवलत देण्यांत यावी.
३) ज्या स्थानिक स्वराज्य संस्था थकबाकीच्या मुद्दलाच्या ७५% रक्कम भरतील त्यांना थकबाकीवर लावलेल्या दंडणीय व्याजाच्या ७५% सवलत देण्यांत यावी.
४) ज्या स्थानिक स्वराज्य संस्था थकबाकीच्या मुद्दलाच्या १००% रक्कम भरतील त्यांना थकबाकीवर लावलेल्या दंडणीय व्याजाच्या १००% सवलत देण्यांत यावी.

उपरोक्त प्रस्तावास संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्यांत येऊन पुढील कार्यवाही शासनाच्या मान्यतेने करण्यासाठी मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले आहे.

**आयत्या वेळेची चर्चा :**

मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी कंत्राटदाराच्या नोंदणी साठी पाणी पुरवठा योजना तसेच जलनि:सारण योजनेच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक केले आहे. त्यामुळे ज्या कंत्राटदाराकडे पाणी पुरवठा तसेच मल:निस्सारण योजनेच्या कामाचा पुरेसा अनुभव नाही अशा कंत्राटदारांची नोंदणी सध्या देण्यात येत नाही. यापूर्वी कंत्राटदारास नोंदणी देत असतांना कंत्राटदाराने केलेल्या सर्व प्रकारच्या कामांचा अनुभव व उलाढाल विचारात घेण्यात येत होती. म.जी.प्रा. मार्फत काढण्यात येणा-या निविदांमध्ये पूर्व अर्हता अटींचा समावेश असतो. त्यामध्ये कामाच्या स्परुपाप्रमाणे पाणी पुरवठा वा मलनि:सारण कामांचा अनुभव असणेबाबत अट असते. त्यामुळे म.जी.प्रा.मध्ये नोंदणीसाठी पुर्वीप्रमाणेच सर्व प्रकारच्या कामांचा अनुभव व उलाढाल ग्राहय धरण्यात यावी, ~~ह्या मुद्यावर चर्चा झाली.~~

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

९२

**कार्यक्रम बाब क्र. २ :-**

**विषय :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३८वी सभा दि. ३० मार्च,२०१७ रोजी संपन्न झाली असून सदर कार्यक्रम बाबींवर घेण्यात आलेल्या निर्णयावर करण्यात आलेली कृती सोबत जोडण्यांत येत आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक ३०.३.२०१७ रोजी झालेल्या १३८व्या सभेच्या कार्यक्रमबाबींवर करण्यात आलेली कार्यवाही.

| अ. क्र. | विषयसूची | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे. | म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाची १३८वी सभा दि.३०.३.२०१७ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा. संचालक मंडळास केली.<br>इतिवृत्तावर सविस्तर चर्चा होवून, १३८व्या सभेच्या इतिवृत्तास वर मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. |
| २ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८व्या सभेपुढील कार्यक्रम बाबींवर करण्यात आलेली कृती. | १३८व्या सभेतील मंजूर कार्यक्रम बाबींवर केलेल्या कार्यवाहीसर सविस्तर चर्चा करण्यांत येऊन केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. |
| ३ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता देणे. | सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सन २०१३-१४ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यांत आला असून तो विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार मा. सदस्य सचिव यांना देण्यांत आले. म.जी.प्रा. चा सन २०१३-१४ वार्षिक अहवाल विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे दि.९.८.२०१७ रोजी सादर करण्यांत आला. |
| ४ | राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळणेबाबत. | सदर कार्यक्रम बाबी बाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्य रित्या गुतवावी या बाबत शासनाने दि.२७.१०.२०१५ अंतर्गत सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार मजीप्राकडूनही अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुका केल्या जातात. असे संचालक मंडळास अवगत केले.<br>दि.२०.७.२०१६ ते दि.२.३.२०१७ या कालावधीमध्ये प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या केलेल्या गुंतवणूकीस कार्योत्तर मंजूरी प्रदान करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| ५ | म.जी.प्रा. च्या लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडे सोपविणे बाबत. कालावधी दि.१.४.२०१७ ते दि.३१.३.२०२२. | म.जी.प्रा. च्या दि.१.४.२०१७ ते दि.३१.३.२०२२ या कालावधीतील लेखा परिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक मुंबई यांचेकडून करुन घेणेबाबत मंजूरी मिळाल्यानंतर शासनाचे पत्र क्र.सीआर-८९/२१३ दि.२१.६.२०१७ अन्वये अधिसूचना (Notification) शासन स्तरावर काढण्यासाठी कळविण्यांत आले. त्यानुसार शासनाचे इंग्रजी पत्र क्र.MJP-IID/ CR-204/WS-23 दि.१८ जुलै २०१७ अन्वये दि. १ एप्रिल, २०१७ पासून ५ वर्षाकरिता म.जी.प्रा.च्या लेखा परिक्षणाचे काम करण्या बाबतची अधिसुचना काढण्यांत आली आहे. |
| ६ | सन २०१६-१७ चे सुधारित व सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पिय अंदाज. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र.मजीप्रा / वित्त-२/अंप / तरतूद वाटप /१२८ /२०१७ दि.२३.६.२०१७ नुसार सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पिय अंदाज वाटप करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्र.मजीप्रा / वित्त-२/निधी/३०६ दि.१०.४.२०१७ नुसार शासनाकडून वेतन भात्ते दायितव व निवृत्ती वेतनाचे दायितव स्विकारण्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी शासनाकडे केली आहे. |
| ७ | १) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ पाणी पुरवठा योजना.<br>२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत बदलापूर पाणी पुरवठा योजना.<br>शासकीय अनुदान वगळता मजीप्राच्या हिश्याची रक्कम उपलब्ध करण्याबाबत. | अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत अंबरनाथ व बदलापूर शहरांच्या पाणी पुरवठा योजनेस आवश्यकेते नुसार घसारा निधी वापरलेला आहे. तसेच अमृत योजनेअंतर्गत सातारा पाणी पुरवठा योजनेस लागणारा घसारा निधी आवश्यकते नुसार वितरीत करण्यात येईल. |
| ८ | उत्तमनगर, शिवणे, कोंढावे, धावडे, न्यु कोपरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना अंतर्गत आकारण्यात येणाऱ्या पाणी दरवाढीस स्थगिती देणेबाबत. | सुधारित पाण्याचे दराप्रमाणे उत्तमनगर, शिवणे, कोंढावे, धावडे, न्यु कोपरे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी लागू करण्यात आले आहेत. |

**आयत्या वेळेच्या कार्यक्रम बाबी.**

| अ.क्र. | विषयसूची | कार्यवाही |
|---|---|---|
| १ | **कार्यक्रम बाब क्र.१**<br>महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्विकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करणेबाबत. | दि.३० मार्च, २०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मजीप्राच्या निविदा समितीच्या ९७व्या बैठकीपर्यंत घेण्यात आलेल्या निविदा स्वीकृती/ अस्वीकृतीच्या निर्णयांवर मा.संचालक मंडळाकडून शिक्कामोर्तब करण्याची कार्यक्रमबाब सादर करण्यात आली. त्यास मा. संचालक मंडळाने मान्यता दिली |

| | | |
|---|---|---|
| | | आहे. १३८व्या बैठकीसमोर सादर करण्यात आलेल्या कार्यक्रम बाबीची प्रत यासोबत सादर केली आहे.<br>तथापी १३८व्या मा.संचालक मंडळाच्या इतिवृत्तामध्ये मजीप्राच्या निविदा समितीच्या ८९व्या बैठकीपर्यत घेण्यात आलेल्या निविदा स्वीकृती/ अस्वीकृतीच्या निर्णयास मा. संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यता झाल्याचे नमुद केलेले आहे. |
| २ | **कार्यक्रम बाब क्र.२**<br>Bottling Plant /Beverages इत्यादी खाजगी वापरासाठी पुरवावयाच्या पाण्याच्या दरांमध्ये सुधारणा करणेबाबत. | सदर कार्यक्रम बाब बैठकीमध्ये ठेवण्यात आली होती. तथापी बैठकीमध्ये यावर सद्यस्थितीत कोणतीही कार्यवाही न करण्याविषयी बैठकीत सुचविल्यानुसार पुढील बैठकीत ठेवण्याच्या सुचना दिल्या आहेत. |
| ३ | **कार्यक्रम बाब क्र.३**<br>स्थानिक स्वराज्य संस्थांकडे थकीत असलैल्या पाणी पट्टी, देखभाल, दुरुस्ती, १०% लोकवर्गणी, पुर्ण ठेव योजना व इतर येणी तसेच कर्जाच्या अनुषंगाने थकबाकीवरील दंडनीय व्याजास सुट देण्याबाबत. | शासनाची मान्यता मिळण्यासाठी मजीप्राकडून पाणी पुरवठा व स्व्च्छता विभागास पत्र क्र.मजीप्रा/वित्त-१/स.क्र./विलंब आकार/१६१/२०१७, दि.२८.६.२०१७ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. |
| | **आयत्या वेळेची दर्चा.** | |
| | मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांनी कंत्राटदारांच्या नोंदणीसाठी पाणी पुरवठा योजना तसेच जलनि:सारण योजनेच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक केले आहे. त्यामुळे ज्या कंत्राटदारांची नोंदणी सध्या देण्यात येत नाही. यापूर्वी कंत्राटदारास नोंदणी देत असतांना कंत्राटदाराने केलेल्या सर्व प्रकारच्या कामांचा अनुभव व उलाढाल विचारात घेण्यात येत होती. मजीप्रा मार्फत काढण्यात येणाऱ्या निविदांमध्ये पूर्व अर्हता अटींचा समावेश असतो. | याबाबत कार्यवाही चालू आहे. |

Original

# कार्यक्रम बाब - २

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्ती च्या घसारा निधीच्या व्याजाच्या रक्कमेतून वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायीत्वाची अदायगी बाबत.

**प्रस्तावना -**

विषयाधीन प्रकरणी शासन निर्णय क्रमांक मजीप्रा २१४/प्र.क्र.३३/(आ)/पापु.२३ दिनांक २३.३.२०१७ च्या निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्ते तसेच सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्विकारले आहे. या शासन निर्णयातील विविध तरतुदी अटी व शर्तीची पुर्तता करण्याचे काम शासन स्तरावर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर प्रगतीपथावर आहे. या शासन निर्णयातील विविध अटी पैकी महत्वाची जी अट होती ती महालेखापालांच्या सहमतीने लेखाशिर्ष निर्माण करणे आता या अटींची पुर्तता झाली असुन पुरवणी मागणी व्दारे लेखाशिर्षाखाली निधी प्राप्त होई पर्यंत प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायित्वाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या उपलब्ध आर्थिक स्त्रोतातुन अदायगी करण्यात यावी असे शासनाचे उप सचिव श्री.सावंत यांचे दि. ३१.७.२०१७ च्या पत्र क्र.मजीप्रा/१११७/प्र.क्र.२२७/ पापु.२३ दि. ३१.७.२०१७ च्या पत्रान्वये कळविले आहे. शासनाच्या अंदाजपत्रकात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी उपलब्ध करुन दयावयाच्या निधीची तरतुद हिच एक महत्वाची बाब प्रलंबित आहे.

**सद्यस्थिती -**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सध्या असलेली भांडवली कामे व त्यातुन मिळणारे महसुली उत्पन्न आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दैनंदिन कारभार चालविण्यासाठी लागणारा महसुली खर्च याचा ताळमेळ घालणे अशक्य झाले असुन माहे ऑगस्ट २०१७ चे वेतन भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्वाची पुर्तता करणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आर्थिक दृष्टया अशक्य झाले आहे.

**प्रस्ताव-**

शासन निर्णय क्र.मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३(अ)/पापु.२३ दि. २३.३.२०१७ मधील निर्देशांप्रमाणे अंतिम कार्यवाही होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतनाच्या दायित्वाची अदायगी करणेसाठी खालील प्रमाणे पर्याय संचालक मंडळापुढे सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा १९७६ मधील अनु.क्र.(३२) मधील तरतुदी नुसार घसारा निधी नियम शासनाच्या मान्यतेने तयार केले आहेत . सदर नियमांची प्रत त्वरित संदर्भासाठी सोबत जोडली आहे. घसारा निधी हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्ती साठी शासन अधिसुचना २० जून १९७७ पासुन उभारण्यात आला असुन सदर निधी राष्ट्रीयकृत बँके मध्ये मुदत ठेवी स्वरुपात गुंतविण्यात आला आहे. माहे दि. ३१.७.२०१७ अखेर घसारा निधीच्या मुददला पोटी दि. १३.२.२०१७ पर्यंत रक्कम रु. ५९८.१४ कोटी इतकी रक्कम गुंतविण्यात आलेली असून त्यावरील व्याजापोटी दि.१३.२.२०१८ पर्यंत रक्कम रु. १३६.६० कोटी इतके व्याज प्राप्त होणार आहे. दि. ७.९.२०१७ अखेर पर्यंत, दि. ३.९.२०१४ व २९.८.२०१५ रोजी अनुक्रमे रक्कम रु. २४८.१२ कोटी व रु. ५५.८५ कोटी अशी गुतवणुक करण्यात आलेली होती त्याची परीपक्वता अनुक्रमे दि. २९.८.२०१७ व ३.९.२०१७ अखेर पर्यंत व्याजापाटी रक्कम रु. ४.१५ कोटी व रक्कम रु. ७६.४१ कोटी अशी एकूण रक्कम रु. ८०.५६ कोटी इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. सबब सदर रक्कम रु. ८०.५६ कोटी या रक्कमेची उपलब्धता चालू वेतन व भत्ते आणि निवृत्ती वेतन या करीता उपयोगात आणण्यास मान्यता असावी असे प्रस्तावित करण्यात येते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा घसारा निधी १९९० मधील नियम क्र. १५ मध्ये नमुद केल्या प्रमाणे घसारा निधी हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्ती या प्रयोजना व्यतिरिक्त इतर बाबींसाठी सदरचा निधी संचालक मंडळाच्या मान्यतेने उपयोगात आणता येईल अशी तरतुद आहे. सदर तरतुदीच्या अनुषंगाने माहे ऑगस्ट २०१७ चे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी सद्य परिस्थिती मध्ये रु. ४.९० कोटीची तुट आहे. तरी वेतन भत्ते व निवृत्ती वेतन अदा करणेसाठी घसारा निधी व्याजाची रक्कम वापरणे प्रस्तावित आहे. सदरची तुट हि निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी अदा करण्यात येते असून माहे ऑगस्ट २०१७ च्या निवृत्ती वेतनासाठी ( ९००० एकूण निवृत्तीवेतन धारक ) एकूण रु.१२.९०

कोटीची आवश्यकता असतांना निवृत्तीवेतनासाठी फक्त रु.८.०० कोटी उपलब्ध असल्याने ते निवृत्ती वेतन धारकांना ६०% अदा करण्यात आले आहेत. उर्वरीत ४०% टक्के साठी रु. ४.९० कोटीची आवश्यकता आहे.

या प्रयोजना व्यतिरिक्त खालील बाबींसाठी सदरचा निधी शासनाकडून प्राप्त होईपर्यंत वापण्यास मान्यता असावी. सदर घसारा निधी व्याजाच्या रक्कमे मधुन जेव्हढी रक्कम वापरली गेली आहे ती त्याच लेख्यात भरणा करुन संचालक मंडळाला अवगत करण्यात येईल.

१) वेतन भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्वाची रक्कम शासनाकडून प्राप्त होई पर्यंत ऑगस्ट २०१७ पासुन पुढील कालावधीसाठी आवश्यक तेवढी तुट येईल ती रक्कम टप्पा टप्याने घसारा निधीव्याजाच्या रक्कमेतुन वापरण्यात येईल .

२) सदरची वापरलेली रक्कम पुन्हा शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर जेवढा निधी माहे डिसेंबर च्या विधान मंडळ अधिवेषना मध्ये म.जी.प्रा.च्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतनाचे दायीत्व या मधील फरकाची रक्कम मंजूर होऊन अर्थसंकल्पीय तरतुद प्राप्त होऊन प्रत्यक्ष म.जी.प्रा.च्या खात्यावर शासनाकडून शासन निर्णय निर्गमित होऊन निधी प्राप्त होईपर्यंत मासिक जी तुट वेतन भत्यासाठी व निवृत्ती वेतनासाठी आवश्यक असेल तेव्हढी रक्कम घसारा निधीच्या व्याजापोटी एकूण रक्कम रु.. १३६.६० कोटी उपलब्ध आहे. त्यामधुन वापरण्यास मंजूरी देण्यात यावी.

३) ही बाब यापुढे कोणताही प्रघात ( Precident ) पायंडा म्हणुन विचारात घेतली जाणार नाही.

४) सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे घसारा निधीतुन एखादया योजनेसाठी / पाणी पुरवठा केंद्रासाठी improvement Agumentation कामे करुन घेण्याचे प्रस्ताव प्रलंबित नाही. म्हणुनआवश्यक तेवढी रक्कम या निधीतून तात्पुरत्या स्वरुपात वळती करुन घेण्यास ( Temproery diversion of fund ) अडथळा नाही.

५) यापूर्वी अंबरनाथ बदलापूर पाणी पुरवठा योजनेसाठी रु. ७.८५१ कोटी एवढी कर्ज उभारण्यासाठी घसारा निधी मधुन निधी वापरण्यात आला आहे.

६) माहे एप्रिल २०१७ पासुन माहे ऑगस्ट २०१७ पर्यंत म.जी.प्रा.चे उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ घेता अंदाजे रु. १३.०० कोटी रुपये इतकी तुट प्रतिमहा येते. तो घसारा निधी रक्कमेच्या व्याजापोटी उपलब्ध असणाऱ्या रक्कमे मधुन वापरण्यास मान्यता असावी.

उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला वेतन भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायीत्वाचा निधी शासनाकडून प्राप्त होई पर्यंत येणारी तुट म.जी.प्रा.च्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतन भागविण्यासाठी उपलब्ध असलेल्या घसारा निधीच्या व्याजामधुन शासनाकडून निधी प्राप्त होई पर्यंत वापरण्यास मान्यता असावी .

सदर घसारा निधी व्यजाच्या रक्कमे मधुन जेवढी रक्कम वापरली गेली आहे ती त्याच लेख्यात भरणा करुन संचालक मंडळास अवगत करण्यात येईल. या बाबतची कार्यवाही संचालक ( वित्त ) यांचेकडून करण्यात येईल.

मान्य असल्यास खालील प्रमाणे ठराव मंजूरीसाठी सादर केला आहे.

**ठराव :-**

शासन निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन राज्य शासना मार्फत अदा करण्याबाबत दि. २३.३.२०१७ मधील तरतुदी नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्त् वेतन राज्य शासनामार्फत अदा करावयाचे आहेत तथापी या शासन निर्णयातील तरतुदींची संपुर्णपणे पुर्तता होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला त्यांच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन भत्ते व निवृत्ती वेतनाचे दायीत्व पुर्ण करण्यासाठी येणारी तुट जेवढी येईल त्या प्रमाणात ( मासिक अंदाजे तुट सद्या उत्पन्नाच्या परिस्थिती लक्षात घेता रु.१३.०० कोटी ) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील उपलब्ध असलेल्या घसारा निधीच्या व्याजापोटी उपलब्ध असलेल्या रु. १३६.६० कोटी मधुन तात्पुरत्या कालावधीसाठी वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने घसारा निधीतुन वापरलेला निधी पुन्हा त्याच खात्यात शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर जमा करणे बंधनकारक राहिल. या बाबतची कार्यवाही वित्त शाखेकडून करण्यात येईल.

घसारा निधीतील व्याजाच्या रक्कमे मधुन वेतन भत्ते व निवृत्ती वेतनासाठी मासिक तुट भरुन काढण्यासाठी निधी वापरण्यास संचालक मंडळ मान्यता देत आहे.

याबाबत सदरची कार्यवाही करण्यासाठी मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

सुधारीत

वित्त.२/निधी शाखा/
दिनांक :६.९.२०१७

**विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांचे ८/२०१७ चे वेतन भत्ते व प्रशासकीय खर्चा करीता निधी वाटप करणे बाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास माहे एप्रिल २०१७ ते दि.३१.८.२०१७ पर्यत प्राप्त झालेल्या उत्पन्न व खर्चाचा गोषवारा

(रु. कोटीत)

| अ.क्र. | तपशिल | दि.१.४.२०१७ ते ३१.८.२०१७ | दि.१.८.२०१७ ते ३१.८.२०१७ |
|---|---|---|---|
| **अ)** | **आरंभीचीशिल्लक** | **०.००** | **(-)५९.५४** |
| **ब)** | **जमा** | | |
| 1 | निविदा विक्री | २.६५ | ०.६१ |
| 2 | तांत्रिक सेवाशुल्क | १९.८५ | ३.४० |
| 3 | पाणी विक्री पोटी उत्पन्न | ७५.९३ | १२.१३ |
| 4 | सल्लागार सेवाशुल्क | ११.९२ | ११.९२ |
| 5 | भंगार विक्री | ०.०० | ०.०० |
| 6 | इमारतीचे भाडे | १.५० | ०.१२ |
| 7 | तात्पुरती गुंतवणुकीवरील जमा व्याज | १९.५९ | २.४७ |
| 8 | E & P व्दारे प्राप्त रक्कम | १९.३२ | ३.१३ |
| 9 | वेतन वजाती | १६.५६ | ३.११ |
| 10 | देखभाल दुरुस्तीसाठी अनुदान | २.९२ | ०.०० |
| 11 | निवृत्ती वेतन अनुदान (2215 1638) | ०.०० | ०.०० |
| 12 | भविष्य निर्वाह निधी व्याज | ०.०० | ०.०० |
| 13 | निवृत्ती वेतनावरील व्याज | ०.०० | ०.०० |
| 14 | निवृत्ती वेतनाची मुददल | ०.०० | ०.०० |
| 15 | इतर वरकड जमा (जलस्वराज्य.२ देखरेख खर्च ) | ०.२५ | ०.२५ |
| 16 | अमृत योजना (प्रकल्प सल्लागार सेवाशुल्क् ) | ०.०० | ०.०० |
| 17 | शासनाकडून 6व्या वेतन आयोग फरका साठी प्राप्त निधी | ०.०० | ०.०० |
| **ब)** | **एकूण ब** | **१७०.४९** | **३७.१४** |
| **क)** | **एकूण (अ+ब)** | **१७०.४९** | **(-) २२.४०** |
| **ड)** | **खर्च** | | |
| 1 | वेतन भत्ते व प्रशासकीय झालेला खर्च | ९१.८० | १८.०० |
| 2 | वैदयकीय खर्च | ०.६४ | ०.११ |
| 3 | रजा रोखीकरण | ९.०५ | १.१५ |
| 4 | निवृत्ती वेतनापोटी झालेला खर्च | ६८.१६ | १२.९० |
| 5 | भ.नि.नि. अग्रीम व अंतिम प्रदान | १७.८४ | ३.०५ |
| 6 | गट विमा क्लेमस | ०.५० | ०.१७ |
| 7 | अहस्तांतरीत पा.पु. केंद्रावरील देखभाल व दुरुस्ती खर्च | १९.५७ | १.६४ |
| 8 | मजीप्राच्या पा.पु.केंद्रावरील खर्च | २७.३७ | ५.०२ |
| 9) | मजीप्राच्या योजनांकरिता उभारलेल्या कर्जावरील मुद्दल व व्याज | ०.०० | ०.०० |
| **ड)** | **एकूण ड** | **२३४.९३** | **४२.०४** |
| | **शिल्लक ( ब-ड )** | **(- )६४.४४** | **(- ) ४.९०** |
| | **अद्यावत शिल्लक ( क-ड )** | **(- )६४.४४** | **(- )६४.४४** |

टिप:-- म.जी.प्रा.ने वेतन भत्ते व निवृत्ती वेतनासाठी ११३ % प्रमाणे महागाई भत्ता लागू केलेला आहे.

20 ५१

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन राज्य शासनामार्फत अदा करण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३ (अ)/ पापु-२३**
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,
क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
तारीखः २३ मार्च, २०१७.

**प्रस्तावना :**

राज्यातील नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा आणि मल:निस्सारण कार्यक्रमांचे जलद गतीने विकास व विनियमन करण्याच्या अनुषंगाने अधिनियम, १९७६ अन्वये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. तद्नंतर शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर, १९७९ अन्वये नगर विकास विभागाच्या अखत्यारीत असलेल्या परिसर अभियांत्रिकी विभागाचे सर्व अधिकारी/ कर्मचारी मत्ता व दायित्वासह महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आले.

नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी, योजनांचे दैनंदिन परिचलन व देखभाल दुरुस्ती, प्रकल्प सल्लागार सेवा, खाजगी सहभागाचे प्रकल्प, सनियंत्रण व संशोधन विकास आणि प्रशिक्षण, गुणवत्ता परीक्षण इत्यादी प्रकारची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील खर्च देखील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या उत्पन्नामधून करण्यात येत आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ मधील कलम २३ व कलम २३-अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील सर्व अधिकारी/ कर्मचाऱ्यांना शासनाचे सर्व नियम व इतर सवलती लागू आहेत.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास प्राप्त होत असलेले ई. अँड पी. शुल्क वारंवार कमी होत असल्याने प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच निवृत्तीवेतन यावरील खर्च कसा भागवावा हा गंभीर प्रश्न महाराष्ट्र जीवन प्राधिकरणापुढे निर्माण झाला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियमातील कलम २७ व २८ नुसार शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आर्थिक सहाय्य करण्याची तरतूद आहे.

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियमित वेतन व भत्त्यांचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनाचे दायित्व शासनामार्फत स्वीकारण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :**

प्रस्तावनेत नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेऊन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियमित वेतन व भत्त्यांचे दायित्व तसेच सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनाचे दायित्व राज्य शासनामार्फत खालील प्रमाणे स्वीकारण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

(१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण म्हणून स्वायत्त होण्यापूर्वी जे अधिकारी/ कर्मचारी शासकीय अधिकारी/ कर्मचारी म्हणून नियुक्त झाले होते, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन राज्य शासनामार्फत अदा करण्यात येईल.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे प्राधिकरण म्हणून स्वायत्त संस्था स्थापन झाल्यानंतर प्राधिकरणामध्ये जे अधिकारी/ कर्मचारी नियुक्त झालेले आहेत, अशा अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविण्यात येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास ईटीपी व तांत्रिक सेवा शुल्कापोटी प्राप्त होणारे उत्पन्न प्राधिकरणाने शासनाकडे दरमहा जमा करावे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचारी यांचे नियमित वेतन व भत्ते आणि निवृत्तीवेतनावरील खर्च भागविण्यासाठी विभागस्तरावर स्वतंत्र लेखाशीर्ष निर्माण करण्यात येईल व त्यामध्ये दरवर्षी आवश्यकतेप्रमाणे निधीची तरतूद करण्यात येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्यांचा भार शासनामार्फत उचलण्यात येत असल्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकाऱ्यांच्या व अभियंत्यांच्या सेवाविषयक बाबी शासन निर्णयाच्या निर्गमित दिनांकापासून पुढे शासन स्तरावर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत हाताळण्यात येतील. त्याकरिता प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम व वेळोवेळी शासनामार्फत निर्गमित केले जाणारे शासन निर्णय लागू राहतील.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांना राज्य शासकीय अधिकारी/ कर्मचारी असा दर्जा देण्यात येत आहे. याअनुषंगाने स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन यापुढे नियमितपणे होण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यप्रणाली ठरविण्यात येत आहे :-**

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांचे वेतन इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे नियमितपणे दरमहा करण्यात यावे.

२) वेतन व भत्ते या संज्ञेत अनुज्ञेय खर्चाची तरतूद प्राधिकरण स्वायत्त होण्यापूर्वी प्राधिकरणातील शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी स्वतंत्रपणे व प्राधिकरण स्वायत्त झाल्यानंतर प्राधिकरणातील अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने करावी व या तरतुदीपोटी प्रत्येक महिन्यास आवश्यक निधी प्राधिकरणास विभागाने उपलब्ध करून द्यावा.

३) वेतन व भत्त्यांसाठी शासनाच्या प्रचलित पद्धतीनुसार प्राधिकरणासाठी भांडवली अंशदान म्हणून लेखाशीर्षाद्वारे तरतूद करण्यात यावी. निवृत्तीवेतनासाठी वेगळ्याने तरतूद दाखविण्यात यावी.

४) वेतनासाठी स्वतंत्र तरतूद केलेली असल्याने, प्रत्येक महिन्यातील उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र शासनास सादर करताना दोन्ही लेखाशीर्षावरील खर्च स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावा.

५) वेतन व भत्त्यांचे दायित्व राज्य शासनाने स्वीकारले आहे, हे विचारात घेता शासनाच्या खर्चात करावयाच्या काटकसरीचे आदेश प्राधिकरणाला जसेच्या तसे लागू राहतील.

सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपाचारिक संदर्भ क्रमांक १६८/१४४३, दिनांक २४/०७/२०१४ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६१/व्यय-३, दिनांक ०४/०३/२०१७ अन्वये प्राप्त अभिप्रायानुसार व मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक १६/०३/२०१७ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201703231709401628 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Kumar

Digitally signed by Rajesh Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply And Sanitation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e08bc9f719f8ce54a66aed8ed2a521ee2d571facec17b204b286a31e88c58d9, cn=Rajesh Kumar
Date: 2017.03.23 18:24:30 +05'30'

(राजेश कुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
८. सर्व लोकसभा सदस्य (महाराष्ट्र राज्य)
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधानभवन, मुंबई
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधानभवन, मुंबई
१५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
१६. सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय, (मूळ न्याय शाखा), मुंबई/ औरंगाबाद/ नागपूर.
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा), मुंबई/ औरंगाबाद/ नागपूर.
१९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/ औरंगाबाद/ नागपूर.
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई/ औरंगाबाद/ नागपूर.
२१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२२. विभागीय आयुक्त (सर्व)
२३. जिल्हाधिकारी (सर्व)
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त.
२५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
२७. महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२८. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३१. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, वरळी, मुंबई.

३२. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.

३३. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था, बेलापूर, नवी मुंबई.

३४. संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

३५. उपसचिव (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई

३६. मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.

३७. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.

३८. मुख्य अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

३९. मुख्याधिकारी (सर्व), नगरपालिका/ नगरपरिषदा.

४०. मंत्रालयीन सर्व विभाग व त्यांच्या अधिनस्त असलेली सर्व कार्यालये.

४१. राज्यातील सर्व महामंडळे, मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक.

४२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

४३. निवडनस्ती (कार्यासन पापु-२३)

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय इमारत संकुल,

क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय इमारत,मुंबई ४०० ००१

दुरध्वनी क्रमांक ०२२ २२६२१७६८ /फॅक्स क्रमांक ०२२ २२६२२०८४/ Email - balasaheb.hajare@nic.in

---

मजीप्रा१५१७/प्र.क्र २२७/पापु २३ दिनांक ३१ जुलै, २०१७

प्रति,

सदस्य सचिव,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,

२ रा मजला, सिडको भवन,

बेलापूर, नवी मुंबई

विषय :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन, भत्ते व निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक मजीप्रा-२०१४/ प्र.क्र.३३(अ) /पापु२३, दि.२३.०३.२०१७

महोदय,

उपरोक्त विषयानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामधील अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन/भत्ते व निवृत्तीवेतनाचे दायित्व शासनाने शासन निर्णयाच्या दिनांकापासून स्वीकारले आहे. त्यानुषंगाने चालू आर्थिक वर्षात निधी प्राप्त करण्यासाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. पुरवणी मागणीद्वारे सदर निधी प्राप्त होईपर्यंत प्राधिकरणाच्या अधिकारी /कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व निवृत्तीवेतनाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून संदर्भाधीन शासन निर्णयापूर्वी पासून आजपावेतो ज्याप्रमाणे प्राधिकरणामार्फत वेतन, भत्ते व निवृत्तीवेतनाची अदायगी करण्यात येत होती, त्याप्रमाणे उपलब्ध आर्थिक स्त्रोतातून अदायगी करण्यात यावी. प्राधिकरणाने विहित दिनांका नंतरच्या दायित्वाच्या केलेल्या या (अनुज्ञेय) खर्चाची शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात येईल.

तसेच शासनाकडील सर्वच विभागातील पदांचा आढावा घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. आर्थिक दायित्वा संदर्भातील नस्ती वित्त विभागास सादर केली असता वित्त विभागाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील पदांचा आढावा घेतला आहे किंवा कसे याबाबत अनौपचारीकपणे पृच्छा केली आहे. सबब महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील मंजूर पदांचा आढावा घेण्याचा प्रस्ताव शासनास त्वरीत (१५ दिवसांमध्ये) सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(महेश सावंत)

उप सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत :-

संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, २ रा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई

# DEPRECIATION RULES

1. **Short title** — These may be called the Maharashtra Water Supply and Sewerage Board Rules, 1990. These rules shall come into force with retrospectice effect from 1.11.1979.

2. **Definition** — In these rules, unless the context otherwise requires:-

   a) 'Act' means Maharashtra Water Supply and Sewerage Board Act, 1976.

   b) 'Govt. or State Govt.' means the Govt. of Maharashtra.

   c) 'Meeting' means meeting of the Board.

   d) 'Schedule' means schedule appended to these rules.

   e) 'Section' means section of the Act.

3. **Principles for annual provisions to be made for depreciation reserve** — The principles for annual provision to be made for the depreciation reserve under section 32 of the M.W.S.S.Board Act, 1976 shall be as follows namely:-

1. The depreciation on the asset shall be calculated by the "Straight Line" method with reference to the original cost of assets.

2. The depreciation on the different classes of assets shall be calculated annually at the rates specified in the schedule.

Depreciation shall be charged proportionately in respect of assets purchased during the year and used for a part of the year, the period not exceedig fifteen days being ignored and the period of, and exceeding fifteen days being reckoned as a month.

4. The amount of depreciation in respect of each asset shall be rounded off to the nearest rupee, fraction not exceeding fifty paise being ignored and fraction of, and exceeding fifty paise being rounded off to a rupee.

5. a) The amount of depreciation, written off every year, shall be invested in such securities as may be decided by the Board, and

b) The periodical interest realised on these securities shall be invested in the same class of securities.

6. The amount of depreciation written off every year shall be debited to "the Depreciation Account" and credited to "the Depreciation Reserve Fund Account".

7. Where a corresponding amount is invested in securities, the entry shall be to debit "Depreciation Reserve Fund Investment Account" and Credit Bank.

8. The periodical interest realised on the invested securities, shall be debited to the Bank and credited to "the Depreciation Reserve Fund Account".

9. On the investment being realised, the entry shall be Bank Account Debit.

To the Depreciation Reserve Fund Investment Account Credit.

10. Any balance in the "Depreciation Reserve Fund Investment Account" shall be transfarred to "the Depreciation Reserve Fund Account".

11. The amount realised on the sale of discarded asse shall be credited to the Asset Account concerned.

12. The depreciation Reserve Fund Account shall be closed its balance being transferred to the Asset Account.

13. The residual value realised in respect of the discard items if any , shall be credited to the "Asset Account" ai balance under that account adjusted by debiting to "Th Depreciation Reserve Fund Account".

14. No discarded asset shall be replaced except with th sanction of the Board. The cost of the new items shall b debited to the concerned "Asset Account".

15. No portion of the fund shall be utilised without the prior approval of the Board for any purpose other than that for which it was constituted.

16. All assets shall be depreciated to the extent of 90% of book value.

*********

2e 23/4

# S C H E D U L E

| Sr.No. | Name of the asset | probable life of asset in years | Rate of depreciation in percentage | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| 1. | Water supply & Sewerage Schemes owned and maintained by the Board which includes. | | | |
| i) | Civil works such as dam, Open wells, bore wells etc. | | | |
| ii) | Pumping machinery such as transformers, electrical pumps, filters, water and sewage treatment plant equipment etc. | 40 | 2·5 | |
| iii) | Reservoir | | | |
| iv) | Gravity mains, rising mains, transmission mains, distribution system etc. | | | |
| v) | Distribution net works, including valves and other ancillary equipment | | | |
| vi) | Building forming part of the water works or sewage system. | | | |
| vii) | Laboratory equimpemtns. | | | |
| viii) | Approvach & Inspection Road | | | |
| ix) | Any other equipment, Assets forming part of the water supply or sewage scheme. | | | |
| x) | Buildings | | | |
| | i) Temporary structure | 15 | 6 2/3 | |
| | ii) Permanent structure | 50 | 2 | |
| xi) | Vehicles. | 10 | 10 | |

| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
|---|---|---|---|---|
| xii) | Furniture and fixture | | | |
| | i) Electric wiring and accessories | 12 | 8 | |
| | ii) Other items | 20 | 5 | |
| | iii) Scientific instruments and Office appliances. | 20 | 5 | |
| | iv) Telephones | 25 | 4 | |
| | v) Electronic equipments. | 3 | 33 | |

NOTE: Although the life of the assets at Sr. No.1 above is different, due to non-availability of componentwise details, the depreciation may be calculated at flat rate of 2.5%.

*[2][Authority] Fund.*

**25.** [1][The Authority] shall have its own fund to be called " the [2][Authority] Loan Fund ", which shall also be deemed to be a local fund and to which shall be credited all moneys received by or on behalf of [1][The Authority] by way of loans.

*Other funds of [1][the Authority].*

**26.** (*1*) [1][The Authority] shall also have another fund to be called " the Loan Fund", which shall also be deemed to be a local fund and to which shall be credited all moneys received by or on behalf of [1][the Authority] by way of loans.

(*2*) Without prejudice to the provisions of section 25 or sub-section (1) of this section, [1][the Authority] may, with the previous approval of the State Government constitute such other funds as may be necessary for the efficient performance of duties and discharge of its functions under this Act.

*General principles for [1][the Authority] finance.*

**27.** (*1*) [1][The Authority] shall not, as far as practicable, and after taking credit for any grant or subvention from the State Government under section 58, carry on its operation under this Act at a loss.

*Grants and subventions to [1][the Authority].*

**28.** The State Government may, under appropriation duly made in this behalf, from time to time, make grants and subvention to [1][the Authority] For the purposes of this Act, on such terms and conditions as the State Government may determine.

*Loans to [1][the Authority].*

**29.** The State Government, from time to time, advance loans to [1][the Authority] on such terms and conditions, not inconsistent with the provisions of this Act, as the State Government and [1][the Authority] may agree upon.

*Initial contribution of Government to [1][the Authority] Fund.*

**30.** Under appropriation duly made in this behalf, the State Government may make an initial contribution to [1][the Authority] Fund of rupees one crore or such lesser sum as it thinks fit.

*Power to borrow and relend.*

**31.** (*1*) [1][The Authority] may, from time to time, with the previous sanction of the State Government and subject to the provisions of this Act and to such conditions as the State Government may, by general or special order, impose, borrow any moneys required for the purposes of this Act by making arrangements with the Banks or other bodies or institutions by the State Government for this purpose.

(*2*) [1][The Authority] may advance any part of such borrowings to any local body for the performance of its duties and discharge of its functions relating to water supply and sewerage services on such terms and conditions as [1][the Authority] may determine.

*Depreciation reserve.*

**32.** [1][The Authority] shall create a depreciation reserve and make annual provision therefor in accordance with such principles as may be prescribed.

*Government as guarantor.*

**33.** The State Government may guarantee the repayment of any loan and payment of interest on all or any of the loans given or transferred to [1][the Authority] for the purposes of this Act.

---

[1] These words were substituted for the words " The Board ", by Mah. 25 of 1997, s. 5.
[2] This word was substituted for the word " Board ", *ibid*, s. 5.

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, जून २०, १९७७/ज्येष्ठ ३०, शके १८९९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत

# भाग एक-अ—मध्य उप-विभाग

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना व्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना

URBAN DEVELOPMENT AND PUBLIC HEALTH DEPARTMENT

Mantralaya, Bombay 400 032, dated 20th June 1977

MAHARASHTRA WATER SUPPLY AND SEWERAGE BOARD ACT, 1976.

No. W.B. 1076/298-UD-22.—The following draft of the Maharashtra Water Supply and Sewerage Board Rules, 1977, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 65 of the Maharashtra Water Supply and Sewerage Board Act, 1976 (Mah. XLVIII of 1976), and of all other powers enabling it in this behalf, is hereby published as required by sub-section (*3*) of the said section 65, for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after the 22nd July 1977.

2. Any objections or suggestions which may be received by the Secretary to the Government of Maharashtra, Urban Development and Public Health Department, from any person with respect to the said draft before the date aforesaid will be considered by Government:—

## DRAFT RULES

1. *Short title.*—These rules may be called the Maharashtra Water Supply and Sewerage Board Rules, 1977.

2. *Definitions.*—In these rules, unless the context otherwise requires,—

(*a*) "Act" means Maharashtra Water Supply and Sewerage Board Act, 1976,
(*b*) "Government" or "State Government" means the Government of Maharashtra,
(*c*) "Meeting" means meeting of the Board,
(*d*) "Schedule" means Schedule appneded to these rules,
(*e*) "section" means section of the Act, and
(*f*) "work-load" means total expenditure incurred on works carried out by the Board in a financial year.

3. *Rate of supervision and centage charges.*—The rate of supervision and centage charges to be determined under clause (*c*) of sub-section (*2*) of section 15 shall be 15 per cent of the work-load.

4. *Principles for annual provision to be made for depreciation reserve.*—The principles for annual provision to be made for the depreciation reserve under section 32 of the Act shall be as follows, namely :—

(1) The depreciation on the assets shall be calculated by the "straight line" method with reference to the original cost of the assets.

(2) The depreciation on the different classes of assets shall be calculated annually at the rates specified in Schedule

(3) Depreciation shall be charged proportionately in respect of assets purchased during the year and used for a part of the year, the period not exceeding fifteen days being ignored and the period of, and exceeding, fifteen days being reckoned as a month.

(4) The amount of depreciation in respect of each asset shall be rounded off to the nearest rupee, fraction not exceeding fifty *paise* being ignored and fraction of, and exceeding, fifty *paise* being rounded off to a rupee.

(5) (*a*) The amount of depreciation, written off every year, shall be invested in such securities as may be decided by the Board, and

(*b*) The periodical interest realised on these securities shall be invested in the same class of securities.

(6) The amount of depreciation, written off every year, shall be debited to "the Depreciation Account" and credited to "the Depreciation Reserve Fund Account".

(7) Where a corresponding amount is invested in securities, the entry shall be to debit "Depreciation Reserve Fund Investment Account" and credit Bank.

(8) The periodical interest realised on the invested securities shall be debited to the Bank and credited to "the Depreciation Reserve Fund Account".

(9) On the investments being realised, the entry shall be Bank ..........................Dr.
To the Depreciation Reserve Fund Investment Account.

(10) Any balance in the "Depreciation Reserve Fund Investment Account" shall be transferred to "the Depreciation Reserve Fund Account".

(11) The amount realised on the sale of the discarded assets shall be credited to the Asset Account concerned.

(12) The depreciation Reserve Fund Account shall be closed by its balance being transferred to the Asset Account.

(13) No asset shall be discarded except with the sanction of the Board. The residual value realised in respect of the discarded items, if any, shall be credited to the "Asset Account" and the balance under that account adjusted by debiting to "the Depreciation Reserve Fund Account".

# MAHARASHTRA JEEVAN PRADIKARAN

## STATEMENT SHOWING FUNDS INVESTED BY MJP AS DEPRICIATION FUND TO 24.7.2017

| sr . no. | Date of Investment | Name of the BANK | Amount | Period | Branch | Rate of Interest | Date of maturity | Account | F.D.R.NO. | Interest | Maturity Value |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3.9.2014 | CANARA BANK | 2397660305 | 3 YEAR | | 9.05 | 3.9.2017 | DEPRICIATION | 4539 | 738400837 | 3136061142 |
| 2 | 3.9.2014 | CANARA BANK | 83610441 | 3 YEAR | | 9.05 | 3.9.2017 | DEPRICIATION | | 25749777 | 109360218 |
| | | **Total** | **2481270746** | | | | | | | **764150614** | **3245421360** |
| 3 | 6.2.2015 | UNION BANK OF INDIA | 70000000 | 3 YEAR | | 8.50 | 6.2.2018 | DEPRICIATION | 309 | 20091304 | 90091304 |
| 4 | 6.2.2015 | UNION BANK OF INDIA | 39536995 | 3 YEAR | | 8.50 | 6.2.2018 | DEPRICIATION | 336 | 11347854 | 50884849 |
| | | **Total** | **109536995** | | | | | | | **31439158** | **140976153** |
| 5 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 96000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 30.11.2017 | DEPRICIATION | 5820 | 27785354 | 123785354 |
| 6 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 96000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 8.12.2017 | DEPRICIATION | 5732 | 28018942 | 124018942 |
| 7 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 97000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 14.12.2017 | DEPRICIATION | 5804 | 28192795 | 125192795 |
| 8 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 98000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 2.12.2017 | DEPRICIATION | 5811 | 28423829 | 126423829 |
| 9 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 96000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 12.12.2017 | DEPRICIATION | 5750 | 28135737 | 124135737 |
| 10 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 96000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 16.12.2017 | DEPRICIATION | 5778 | 28252531 | 124252531 |
| 11 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 97500000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 14.12.2017 | DEPRICIATION | 5769 | 28634667 | 126134667 |
| 12 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 97000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 18.12.2017 | DEPRICIATION | 5787 | 28605834 | 125605834 |
| 13 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 97384981 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 6.12.2017 | DEPRICIATION | 5723 | 28363929 | 125748910 |
| 14 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 96000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 6.12.2017 | DEPRICIATION | 5796 | 28369326 | 124369326 |
| 15 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 93000000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 28.11.2017 | DEPRICIATION | 5839 | 26860489 | 119860489 |
| 16 | 23.12.2014 | PUNJAB NATIONAL BANK | 97500000 | 3 YEAR | C.B.D | 8.75 | 10.12.2017 | DEPRICIATION | 5741 | 28516048 | 126016048 |
| 17 | 6.2.2015 | PUNJAB NATIONAL BANK | 80000000 | 3 YEAR | C.B.D | 8.50 | 6.2.2018 | DEPRICIATION | 5995 | 22961491 | 102961491 |
| 18 | 6.2.2015 | PUNJAB NATIONAL BANK | 29536996 | 3 YEAR | C.B.D | 8.50 | 9.2.2018 | DEPRICIATION | 5995 | 8504226 | 38041222 |
| | | **Total** | **1266921977** | | | | | | | **369625198** | **1636547175** |
| 19 | 6.2.2015 | STATE BANK OF INDIA | 109536995 | 3 YEAR | FORT | 8.50 | 5.2.2018 | DEPRICIATION | 462 | 27931934 | 137468929 |
| 20 | 25.3.2015 | STATE BANK OF INDIA | 82133689 | 3 YEAR | FORT | 8.50 | 25.3.2018 | DEPRICIATION | 462 | 23573899 | 105707588 |
| | | **Total** | **191670684** | | | | | | | **51505833** | **243176517** |
| 21 | 20.5.2015 | CENTRAL BANK | 19063059 | 3 YEAR | | 8.50 | 20.5.2018 | DEPRICIATION | 2096 | 5471453 | 24534512 |
| 22 | 20.5.2015 | CENTRAL BANK | 34777074 | 3 YEAR | | 8.50 | 20.5.2018 | DEPRICIATION | 2097 | 9981668 | 44758742 |
| | | **Total** | **53840133** | | | | | | | **15453121** | **69293254** |
| 23 | 29.8.2016 | H.D.F.C BANK | 558523879 | 365 DAYS | | 7.25 | 29.8.2017 | DEPRICIATION | | 41567233 | 600091112 |
| 24 | 31.12.2016 | H.D.F.C BANK | 262033040 | 365 DAYS | | 6.25 | 31.12.2017 | DEPRICIATION | | 16764777 | 278797817 |
| | | **Total** | **820556919** | | | | | | | **58332010** | **878888929** |
| 25 | 20.10.2016 | YES BANK | 268812824 | 365 DAYS | | 7.40 | 20.10.2017 | DEPRICIATION | | 20439497 | 289252321 |
| 26 | 19.5.2017 | YES BANK | 105013921 | 365 DAYS | | 6.95 | 18.5.2018 | DEPRICIATION | | 7490883 | 112504804 |
| 27 | 6.1.2017 | YES BANK | 300000000 | 365 DAYS | | 6.53 | 5.1.2018 | DEPRICIATION | | 20074938 | 320074938 |
| 28 | 8.6.2017 | YES BANK | 370137124 | 365 Days | | 7.00 | 7.6.2018 | DEPRICIATION | | 26597675 | 396734799 |
| | | **Total** | **1043963869** | | | | | | | **74602993** | **1118566862** |
| 29 | 13.2.2017 | IndusInd Bank | 13723291 | 365 DAYS | | 6.50 | 13.2.2018 | DEPRICIATION | | 913991 | 14637282 |
| | | **Total** | **13723291** | | | | | | | **913991** | **14637282** |
| | | **Grand Total** | **5981484614** | | | | | | | **1366022918** | **7347507532** |

33

31/5

MATURITY 2017

D:\bkp 18.5.16\Desktop\INVESTMENT_2

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


**क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४/११८/२०१७** **दिनांक : २९.९.२०१७**

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय** : दि.१२ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३९व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३९व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपला विश्वासू,**

**(अशोक मांडे)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.)**

**सोबत** : वरील प्रमाणे.

**प्रत** : खाजगी सचिव, मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. व स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे ही विनंती.

**माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा., प्रादेशिक विभाग, ठाणे / पुणे /नाशिक /औरंगाबाद /अमरावती / नागपूर.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी,. म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आ. - ) म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

सोबत इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधित कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसात मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३९ व्या सभेचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १३९वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.ना.श्री.बबनराव लोणीकर यांचे अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी दुपारी १.०० वा. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे दालनात, मंत्रालय, मुंबई ४०००३२ येथे संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.ना. श्री.बबनराव लोणीकर, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.प्रधान सचिव,(वित्तीय सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, यांचे प्रतिनिधी श्रीमती. शोभा मत्रे, उप सचिव.
३) मा.श्री.संतोष कुमार, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.सुधाकर डांगे, संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्री.अशोक मांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी (प्र.) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
३) श्री.एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ :** म.जी.प्राच्या १३८ व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या संचालक मंडळाची १३८वी सभा दि.३० मार्च, २०१७ रोजी संपन्न झाली. सदर सभेच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी मा.संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १३८व्या सभेच्या इतिवृत्तास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.२ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३८ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्याबाबत.

संचालक मंडळाची दि.३० मार्च, २०१७ रोजी संपन्न झालेल्या १३८व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले, त्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यामध्ये आयत्या वेळेच्या चर्चेचा विषय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये कंत्राटदाराच्या नोंदणीसाठी पाणी पुरवठा योजना तसेच जलनि:सारण योजनेच्या कामाचा अनुभव असणे आवश्यक असणे या विषयी मा.मंत्रीमहोदयांनी चर्चा केली. ठेकेदारांना नोंदणी देताना कामाचा अनुभव असणे ही अट शिथील करता येईल का, याबाबत चर्चा झाली. यानंतर १३८ व्या सभेपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कृतीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पाणी पुरवठा केंद्राच्या घसारा निधीमधून उपलबध असणा-या व्याजाच्या रक्कमेमधून कर्मचाऱ्यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायीत्वाच्या अदायगीबाबत.

सदर कार्यक्रम बाबी बाबत मा. सदस्य सचिव, यानी संचालक मंडळास अवगत केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणराकडे सध्या असलेली भांडवली कामे व त्यातून मिळणारे महसुली उत्पन्न आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी लागणारा महसुली खर्च याचा ताळमेळ घालणे अशक्य झाले आहे. ऑगस्ट २०१७ चे वेतन व भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्वाची पुर्तता करणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला आर्थिक दृष्ट्या अशक्य झाले असल्याचे अवगत केले.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक मजीप्रा २१४/प्र.क्र.३३/(आ)/पापु.२३, दिनांक २३.३.२०१७ च्या निर्णयानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्ते तसेच सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्विकारले आहे. या शासन निर्णयातील विविध तरतुदी, अटी व शर्तीची पुर्तता करण्याचे काम शासन स्तरावर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण स्तरावर प्रगतीपथावर आहे. या शासन निर्णयातील विविध अटी पैकी महत्वाची जी अट होती ती महालेखापालांच्या सहमतीने लेखाशिर्ष निर्माण करणे आता या अटींची पुर्तता झाली असुन पुरवणी मागणी व्दारे लेखाशिर्षाखाली निधी प्राप्त होई पर्यंत प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन दायित्वाचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने त्यांच्या उपलब्ध आर्थिक स्त्रोतातुन अदायगी

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

करण्यात यावी, असे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने पत्र क्र.मजीप्रा/१११७ /प्र.क्र.२२७/पापु.२३ दि.३१.७.२०१७ अन्वये कळविले आहे. शासनाच्या अंदाजपत्रकात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी उपलब्ध करुन दयावयाच्या निधीची तरतुद हीच एक महत्वाची बाब प्रलंबित आहे.

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.मजीप्रा-२०१४/प्र.क्र.३३(अ)/पापु.२३, दि.२३.३.२०१७ मधील निर्देशांप्रमाणे अंतिम कार्यवाही होईपर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतनाच्या दायित्वाची अदायगी करणेसाठी खालील प्रमाणे पर्याय संचालक मंडळापुढे सादर करण्यात आला.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कायदा १९७६ मधील अनु.क्र.(३२) मधील तरतुदीनुसार घसारा निधी नियम शासनाच्या मान्यतेने तयार केले आहेत. सदर नियमांची प्रत त्वरित संदर्भासाठी सोबत जोडली आहे. शासन अधिसूचना २० जून १९७७ अन्वये 'घसारा निधी' हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्तीसाठी उभारण्यात आला असुन सदर निधी राष्ट्रीयकृत बँके मध्ये मुदत ठेवी स्वरुपात गुंतविण्यात आला आहे. माहे दि.३१.७.२०१७ अखेर घसारा निधीच्या मुद्दला पोटी दि.१३.२.२०१७ पर्यंत रक्कम रु.५९८.१४ कोटी इतकी रक्कम गुंतविण्यात आलेली असून त्यावरील व्याजापोटी दि.१३.२.२०१८ पर्यंत रक्कम रु. १३६.६० कोटी इतके व्याज प्राप्त होणार आहे. दि. ७.९.२०१७ अखेर पर्यंत, दि.३.९.२०१७ व २९.८.२०१७ रोजी अनुक्रमे रक्कम रु.२४८.१२ कोटी व रु.५५.८५ कोटी अशी गुंतवणुक करण्यात आलेली होती त्याची परीपक्वता अनुक्रमे दि.२९.८.२०१७ व ३.९.२०१७ अखेर पर्यंत व्याजापाटी रक्कम रु.४.१५ कोटी व रक्कम रु.७६.४१ कोटी अशी एकूण रक्कम रु.८०.५६ कोटी इतकी रक्कम प्राप्त झालेली आहे. सबब रु.८०.५६ कोटी या रकमेची उपलब्धता असल्याने फक्त निवृत्ती वेतन या करीता उपयोगात आणण्यास मान्यता असावी, असे प्रस्तावित करण्यात येते.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा घसारा निधी १९९० मधील नियम क्र.१५ मध्ये नमुद केल्या प्रमाणे घसारा निधी हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा योजना व देखभाल दुरुस्ती या प्रयोजना व्यतिरिक्त इतर बाबींसाठी सदरचा निधी संचालक मंडळाच्या मान्यतेने उपयोगात आणता येईल, अशी तरतुद आहे. सदर माहे ऑगस्ट २०१७ चे वेतन भत्ते व निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी सद्य परिस्थिती मध्ये रु.४.९० कोटीची तुट आहे. तरी वेतन भत्ते व निवृत्ती वेतन अदा करणेसाठी घसारा निधी व्याजाची रक्कम वापरणे प्रस्तावित आहे. सदरची तुट ही निवृत्ती वेतन अदा करण्यासाठी अदा करण्यात येते असून माहे ऑगस्ट २०१७ च्या निवृत्ती वेतनासाठी (एकूण निवृत्तीवेतन धारक ९०००) एकूण रु.१२.९० कोटीची आवश्यकता असतांना निवृत्तीवेतनासाठी फक्त रु.८.०० कोटी

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

उपलब्ध असल्याने ते निवृत्ती वेतन धारकांना माहे ऑगस्ट २०१७ च्या मासिक निवृत्ती वेतनापोटी देय असलेल्या निवृत्ती वेतनाच्या ६०% वेतन अदा करण्यात आले आहे. उर्वरीत ४०% साठी रु.४.९० कोटीची आवश्यकता आहे.

या प्रयोजना व्यतिरिक्त खालील बाबींसाठी सदरचा निधी शासनाकडून प्राप्त होईपर्यंत वापरण्यास मान्यता असावी. सदर घसारा निधी व्याजाच्या रक्कमे मधुन जेवढी रक्कम वापरली गेली आहे ती रक्कम शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर त्याच लेख्यात भरणा करुन संचालक मंडळाला अवगत करण्यात येईल.

१) वेतन भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्वाची रक्कम शासनाकडून प्राप्त होई पर्यंत ऑगस्ट २०१७ पासुन पुढील कालावधीसाठी जेवढी तुट येईल ती रक्कम टप्या टप्याने घसारा निधीव्याजाच्या रक्कमेतुन वापरण्यात येईल .

२) सदरची वापरलेली रक्कम पुन्हा शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर जेवढा निधी माहे डिसेंबर च्या विधान मंडळ अधिवेशनामध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतनाचे दायीत्व या मधील फरकाची रक्कम मंजूर होऊन अर्थसंकल्पीय तरतुद प्राप्त होऊन शासनाकडून शासन निर्णय निर्गमित होऊन प्रत्यक्ष महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या खात्यावर निधी प्राप्त होईपर्यंत मासिक जी तुट वेतन भत्यासाठी व निवृत्ती वेतनासाठी आवश्यक असेल तेवढी रक्कम घसारा निधीच्या व्याजापोटी एकूण रक्कम रु.. १३६.६० कोटी उपलब्ध आहे, त्यामधुन वापरण्यास मंजूरी देण्यात यावी.

३) ही बाब यापुढे कोणताही प्रघात (Precedent) पायंडा म्हणुन विचारात घेतली जाणार नाही.

४) सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे घसारा निधीतुन एखादया योजनेसाठी /पाणी पुरवठा केंद्रासाठी improvement Agumentation कामे करुन घेण्याचे प्रस्ताव प्रलंबित नाही. म्हणुन आवश्यक तेवढी रक्कम या निधीतून तात्पुरत्या स्वरुपात वळती करुन घेण्यास (Temproery diversion of fund ) अडथळा नाही.

५) यापूर्वी अंबरनाथ बदलापूर पाणी पुरवठा योजनेसाठी रु.७.८५१ कोटी एवढी कर्ज उभारण्यासाठी घसारा निधी मधुन निधी वापरण्यात आला आहे.

६) माहे एप्रिल २०१७ पासुन माहे ऑगस्ट २०१७ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उत्पन्न व खर्च यांचा ताळमेळ घेता अंदाजे रु.१३.०० कोटी रुपये इतकी तुट प्रतिमाह येते. तो घसारा निधी रक्कमेच्या व्याजापोटी उपलब्ध असणाऱ्या रक्कमे मधुन वापरण्यास मान्यता असावी.

मा.अध्यक्ष तथा
मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला वेतन भत्ते व सेवानिवृत्ती वेतनाचे दायित्वाचा निधी शासनाकडून प्राप्त होई पर्यंत येणारी तुट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणच्या वेतन भत्ते व निवृत्ती वेतन भागविण्यासाठी उपलब्ध असलेल्या घसारा निधीच्या व्याजामधुन शासनाकडून निधी प्राप्त होई पर्यंत वापरण्यास मान्यता असावी .

सदर घसारा निधी व्यजाच्या रक्कमे मधुन जेवढी रक्कम वापरली गेली आहे ती त्याच लेख्यात भरणा करुन संचालक मंडळास अवगत करण्यात येईल. या बाबतची कार्यवाही संचालक (वित्त) यांचेकडून करण्यात येईल.

कार्यक्रम बाब मान्य करण्यांत येवून खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

**ठराव :-**

शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग दि.२३.३.२०१७ मधील तरतुदी नुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी कर्मचारी यांचे वेतन भत्ते व निवृत्त वेतन राज्य शासनामार्फत अदा करावयाचे आहेत. तथापी या शासन निर्णयातील तरतुदींची संपुर्णपणे पुर्तता होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. या बाबत चर्चा होवून मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्व्च्छता व अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील निवृत्ती वेतन धारकांचे माहे ऑगस्ट २०१७ रोजीचे निधी अभावी रोखून ठेवलेले ४०% निवृत्ती वेतन देण्यासाठी घसारा निधीच्या व्याजापोटी मजीप्राकडे उपलब्ध असलेल्या रु.१३६.६० कोटी मधून रु.४.९० कोटी माहे तात्पुरत्या स्वरुपात वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. निवृत्ती वेतनासाठी वापरण्यात आलेला घसारा निधी शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर पुन्हा त्याच खात्यात जमा करणे बंधनकारक राहिल. या अटीच्या अधीन राहून संचालक मंडळाने मान्यता प्रदान प्रदान करण्यात येत आहे. या बाबतची पुढील कार्यवाही वित्त शाखेने इतिवृत्ताची वाट न बघता करावी. तसेच माहे सप्टेंबर २०१७ पासून शासनाचा निधी प्राप्त होईपर्यंत वेतन भत्ते व सेवानिवृत्ती वेतनासाठी जेवढी तूट येईल, तेवढी रक्कम घसारा निधीतून खर्च करण्यास परवानगी देणेबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवावा.

याबाबत सदरची कार्यवाही करण्यासाठी मा. सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा**
**मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

पत्राची पोहच.

क्र.मजीप्रा-२०१७/सभा-१३९/(४०)/आ.४ दिनांक : ०३.१०.२०१७

**विषय** :दि.१२.९.२०१७ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १३९व्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक 3/10/17

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

लिपीक,
मंत्री
ग्रामविकास आणि महिला व बालविकास
यांचे कार्यालय,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

लिपिक
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय, मुंबई

अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

आवक लिपिक
नगरविकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.)

उप सचिव, पा.पु. व स्व विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२.

अ. अ. (मुख्यालय) मुंबई

Received copy

मा. संचालक (वित्त)

सर्व मु. अ. मजीप्रा.

निर्गमित

उप मुख्य लेखाधिकारी १/२ मजीप्रा. नि. भवन

आ. अ. (द.)

प्र. जी. आ. अ.

कायदा व कामगार अधिकारी,

कक्ष अधिकारी/कार्यासन अधिकारी लेखा शाखा.

आ. १ कांबळे
आ. २ चौधरी
आ. ३ महाडीक
आ. ५ भगत
आ. ६
आ. ७ (नां.प्र.)
आ. ८
रोख आ.
नि. खे. आ.